महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०७ वे | दिनांक : १२/०४/२०२६ | वार : रविवार

## शरद पवारांचे वारकरी संप्रदायाबाबतचे विधान योग्य - रोहित पवार



**मुंबई** : "वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला समता, बंधुभाव आणि एकतेची शिकवण दिली आहे. मात्र, अलीकडच्या काळात या संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी होत असून, यामुळे चळवळीचा मूळ प्रबोधनात्मक हेतू धोक्यात येत आहे," अशी स्पष्ट भूमिका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मांडली. त्यांच्या या भूमिकेला आमदार रोहित पवार यांनी खंबीर पाठिंबा दिला असून, यावरून सत्ताधारी भाजप आणि संबंधित संघटनांवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या 'अखिल भारतीय साहित्य संमेलना'निमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेत शरद पवार यांनी वारकरी संप्रदायातील बदलत्या स्वरूपावर चिंता व्यक्त केली होती. त्यांच्या या विधानाचे समर्थन करत रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, पवार साहेबांनी जे म्हटले आहे, ती खरी वस्तुस्थिती आज आहे. बाहेर राज्यातून येणारे काही जण संतांविरोधात बोलतात, पण प्रतिगामी विचारांचे लोक शांत बसतात. वारकरी संप्रदाय अन् तिथे असणारे सामान्य वारकरी हे अजूनपर्यंत तरी संतांच्या विचाराचे आहेत. पण त्या विचारांवर अतिक्रमण किंवा संक्रमण करण्याचा प्रयत्न प्रतिगामी किंवा मनुवाद पुढे घेऊन जाणाऱ्या विचाराचे लोक करत आहेत.

रोहित पवार म्हणाले की, "संतांनी नेहमीच भेदभावाचा निषेध करून समतेची शिकवण दिली. मात्र, आज काही राजकीय पक्ष आणि त्यांना पाठबळ देणाऱ्या प्रतिगामी संघटना वारकरी संप्रदायात संक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्राबाहेरील काही नेते आणि तथाकथित गुरुवर्य येथे येऊन आपल्या संतांविरुद्ध बोलतात, पण हे प्रतिगामी लोक तेव्हा मूग गिळून गप्प बसतात. ज्यांनी वारकरी संप्रदायावर हल्ले केले आणि वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला, तेच लोक आज पवार साहेबांवर टीका करत आहेत. साहेबांनी मांडलेली भूमिका ही आजची वस्तुस्थिती आहे."

भोंदू अशोक खरात प्रकरणावर बोलताना रोहित पवार यांनी धक्कादायक शंका उपस्थित केली. ते म्हणाले, "पुरोगामी महाराष्ट्रात जर काही नेते 'ब्लॅक मॅजिक' (जादूटोणा) करत असतील, तर त्यांची नावे समोर येणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रकरणाची एसआयटी चौकशी सुरू आहे आणि अनेक गोष्टी बाहेरही आल्या आहेत. मात्र, अद्याप काही बड्या नेत्यांची माहिती का दडवली जात आहे? त्या व्हिडिओंचा आणि पुराव्यांचा वापर भाजप राजकीय दबाव आणण्यासाठी किंवा नेत्यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी करत आहे का?" असा सवालही रोहित पवार यांनी उपस्थित केला.

बारामती पोटनिवडणुकीवर भाष्य करताना आपण सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराला जाणार असल्याचे रोहित पवार म्हणालेत. अजित दादांकडे बघून नक्कीच त्या ठिकाणी, प्रचाराला जाईल फॉर्म भरायला बोलावले नसले, प्रचाराला बोलावलं नसले तरी ही ही निवडणूक आताच्या उमेदवाराकडे बघून होती असे नाही. अजितदादांचे कार्य, अजितदादांची पद्धत स्टाईल आणि त्यांनी आजपर्यंत केलेले कार्य या सगळ्या गोष्टीकडे बघून ही निवडणूक त्या ठिकाणी होत असल्याचेही रोहित पवार म्हणालेत. त्यांनी प्रचाराला बोलावलं, नाही बोलवलं तरी आम्ही त्या ठिकाणी जाऊन प्रचार करू. जी लीड अजितदादांना मिळायची त्या ठिकाणी सुनेत्रा काकींना मिळावी, आमच्या सगळ्यांचा प्रयत्न असेल असे रोहित पवार म्हणाले.

## अमोल मिटकरींकडून 'जस्टिस फॉर दादा' आंदोलनाची हाक



**अकोला** : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला अडीच महिने उलटूनही तपासाचे सत्य अद्याप समोर आले नसल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी केला आहे. "अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी मी एकटाच पायऱ्यांवर बसलो, पण दुर्दैवाने इतर आमदारांची हवी तशी साथ मिळाली नाही," अशी खंत व्यक्त करत अमोल मिटकरींनी आता 'जस्टिस फॉर दादा' (Justice For Dada) या मोहिमेद्वारे रणशिंग फुंकले आहे.

आमदार मिटकरी यांनी एका 'लाईव्ह' संवादातून आपल्या मनातील सल बोलून दाखवली. ते म्हणाले, "अधिवेशनाच्या काळात शंभुराज देसाई यांच्या साताऱ्याच्या प्रकरणावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीचे ४० आमदार एकत्र आले. मात्र, मी जेव्हा अजितदादांच्या अपघाताच्या तपासासाठी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलनाला बसलो, तेव्हा विनंती करूनही कुणीही आले नाही. जर त्यावेळी सर्व आमदार एकवटले असते, तर आज तपासाचे चित्र वेगळे असते. दुर्दैवाने आम्ही ती वेळ गमावली."

अमोल मिटकरी यांनी तपासातील तांत्रिक बाबींवरून अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. "केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी १५ दिवसांत ब्लॅक बॉक्सचा डेटा जाहीर करण्याचे आश्वासन दिले होते, मग अडीच महिने झाले तरी तो डेटा समोर का आला नाही? विमानतळावरील गेट नंबर ८ पासून विमानात बसेपर्यंतचे सीसीटीव्ही फुटेज का लपवले जात आहेत? विमानात ५ प्रवासी होते की ६, हे सरकारने स्पष्ट करावे," अशी मागणी त्यांनी केली.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (DGCA) भूमिकेवरही अमोल मिटकरींनी संशय व्यक्त केला. प्राथमिक अहवालात अपघातस्थळी झाड असल्याचे दाखवण्यात आले आहे, मात्र प्रत्यक्षात तिथे कोणतेही झाड नव्हते, असा दावा त्यांनी केला. तसेच, पायलट कोण होता आणि विमानात नेमके किती लोक होते, याचा उलगडा अद्याप का झाला नाही? असा सवाल करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी अमोल मिटकरी आता जनतेचे न्यायालय गाठणार आहेत. त्यासाठी त्यांनी राज्यभर 'जस्टिस फॉर दादा' आंदोलनाची घोषणा केली आहे. आगामी काळात जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर यात्रा काढली जाईल. प्रत्येक ग्रामसभेत या प्रकरणाच्या चौकशीचा ठराव मंजूर करून तो मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना सादर केला जाणार आहे. अजितदादांना न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा निर्धार अमोल मिटकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

## मराठवाडा हादरला! हिंगोलीत ४.७ रिश्टरचा भूकंप

**हिंगोली** : मराठवाडा परिसरात पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के जाणवले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज सकाळी ८ वाजून ४७ मिनिटांनी हिंगोली जिल्ह्यात भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ इतकी नोंदवली गेली आहे. अचानक बसलेल्या या धक्क्यामुळे नागरिक काही काळ घराबाहेर पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

भूकंप हिंगोली जिल्ह्यातील औंढानागनाथ परिसरात झाल्याची माहिती सर्वप्रथम समोर आली. मात्र, वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे गावाजवळ भूकंपाचे मुख्य केंद्र असल्याचे प्राथमिक निष्कर्षातून स्पष्ट झाले आहे. या भागात काही सेकंद जमीन हलल्याची जाणीव नागरिकांना झाली.

या भूकंपाची नोंद लातूर येथील भूकंप मापन केंद्रावर करण्यात आली आहे. मराठवाड्यातील भूकंपीय हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रांनी तात्काळ या घटनेची माहिती संकलित केली. अधिकृत आकडेवारीनुसार, भूकंपाची तीव्रता मध्यम स्वरूपाची असली तरी काही ठिकाणी कंप स्पष्टपणे जाणवले.हिंगोलीसह नांदेड आणि परभणी जिल्ह्यांमध्येही या भूकंपाचे धक्के जाणवले. अनेक नागरिकांनी घरातील वस्तू हलल्याचे सांगितले. काही ठिकाणी लोक घाबरून घराबाहेर धावले, मात्र सुदैवाने आतापर्यंत कोणतीही मोठी जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती नाही.

प्रशासनाने नागरिकांना घाबरू नये, शांत राहावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरित प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. स्थानिक प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, मराठवाडा हा भूकंपप्रवण पट्टा मानला जात असल्याने अशा घटनांची पुनरावृत्ती होत असते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून सुरक्षिततेच्या उपाययोजना पाळाव्यात, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.

१९९३ सालचा किल्लारी भूकंप हा महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात भीषण नैसर्गिक आपत्तींमध्ये गणला जातो. ३० सप्टेंबर १९९३ रोजी पहाटे साधारण ३ वाजून ५६ मिनिटांनी हा भूकंप झाला. याची तीव्रता रिश्टर स्केलवर सुमारे ६.३ इतकी नोंदवली गेली होती. या भूकंपाचा केंद्रबिंदू लातूर जिल्ह्यातील किल्लारी गावाजवळ होता, तर उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक भागांनाही याचा मोठा फटका बसला. या भूकंपात हजारो लोकांचा जीव गेला आणि अनेक गावे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. अधिकृत आकडेवारीनुसार सुमारे १० हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला, तर हजारो जखमी झाले. किल्लारी, उस्मानाबाद, लातूर परिसरातील घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. अनेक कच्ची घरे आणि दगडी बांधकामे क्षणार्धात कोसळली, त्यामुळे लोकांना पळून जाण्याची संधीही मिळाली नाही. हा भूकंप रात्रीच्या वेळी झाल्याने लोक गाढ झोपेत होते, त्यामुळे नुकसान अधिक झाले. अनेक कुटुंबे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. गावागावात भीषण हाहाकार माजला होता. रस्ते, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था यांचे मोठे नुकसान झाले. बचाव आणि मदतकार्य सुरू करण्यात सुरुवातीला अडचणी आल्या, मात्र नंतर शासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य राबवले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ एप्रिल २०२६

# जे. ई. एस. महाविद्यालय जालना येथे महात्मा फुले जयंती साजरी



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे इएस महाविद्यालय जालना येथे महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, यावेळी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री व उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना व उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, पर्यवेक्षक डॉ. सुमन बिक्कड, पर्यवेक्षक प्रा. ज्ञानेश्वर धनवे, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा डॉ राजेंद्र सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी, प्रा योगेश लहामाटे प्रा. डॉ. अरविंद महाजन, श्री शामराव राठोड,आदी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुलेंच्या कार्याने समाजात अमुलाग्र बदल झाला - प्राचार्य डॉ. एल. बी. पवार



**पिंपळनेर** : महात्मा जोतीराव फुले यांनी जीवनात खूप संघर्ष करून समाजात आमलाग्र बदल घडवून आणला. शिक्षणाचे महत्त्व सांगून स्त्री पुरुष समानता घडवून आणली.अनेक वाईट कर्मकांडातून बाहेर काढून विधवा पुर्नविवाह घडवून आणले. मानवी समानता निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक लढे दिले. समाजातून त्यांना विरोध झाला त्याला न जुमानता आपले कार्य त्यांनी निष्ठेने आणि प्रामाणिकपणे. त्यामुळेच आज समाजामध्ये स्त्रिया उच्च पदावर आहेत.त्यांच्या क्रांतीमुळेच आज समाजामध्ये नवनवीन बदल झालेले दिसून येतात.असे मत अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी. पवार यांनी व्यक्त केले.यावेळी विचारमंचावर मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ.सतीश मस्के व राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. के.एन.वसावे आदी उपस्थित होते. कर्म. आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयात पुढे बोलताना संदीप संसारे म्हणाले की,समाजातील तरूणांनी महापुरुषांचे चरित्र वाचून आपले चारित्र्य निर्माण केले पाहिजे. चारित्र्य निर्माण करण्यासाठी शिस्तीचे नियम पाळणे महत्त्वाचे आहे. आजचा तरुण हा अनेक वेगवेगळ्या व्यसनात अडकला आहे. वाहन चालवतानाही नियमांचे पालन करताना दिसत नाही. त्यामुळे अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होताना दिसत आहे. त्यासाठी तरुणांनी व्यसनापासून दूर राहुन रस्ता सुरक्षेचे व्यवस्थित नियम पाळून आपले जीवन घडवायला हवे. अध्यक्ष समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पवार म्हणाले की, महात्मा जोतीराव फुले यांनी जीवनात खुप संघर्ष करून समाजात आमलाग्र बदल घडवून आणला. शिक्षणाचे महत्त्व सांगून स्त्री पुरुष समानता घडवून आणली.अनेक वाईट कर्मकांडातून बाहेर काढून विधवा पुर्नविवाह घडवून आणले.

मानवी समानता निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक लढे दिले. समाजातून त्यांना विरोध झाला त्याला न जुमानता आपले कार्य त्यांनी निष्ठेने आणि प्रामाणिकपणे. त्यामुळेच आज समाजामध्ये स्त्रिया उच्च पदावर आहेत.त्यांच्या क्रांतीमुळेच आज समाजामध्ये नवनवीन बदल झालेले दिसून येतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. आभार प्रा.के.एन.वसावे यांनी मानले.कार्यक्रमाची सुरूवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

कार्यक्रमाला प्रा.एल. जे.गवळी,प्रा.पत्ती, सुनील पवार व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# राष्ट्रीय लोक मोर्चा पक्षाच्या महाराष्ट्र अध्यक्षपदी बाबासाहेब पठारे यांची नियुक्ती



**छत्रपती संभाजतीनगर** : राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टी पूर्व केंद्रीय मंत्री भारत सरकार तथा राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय मा. श्री. उपेंद्र कुशवाह जी व मा. श्री. अरविंद वाजपेयी जी राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष आणि राष्ट्रीय प्रवक्ता यांच्या आदेशाने राष्ट्रीय उपाध्यक्ष मा श्री पृथ्वीराज यादव जी यांच्या मार्फत महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ची जिम्मेदारी मा. श्री. बाबासाहेब पठारे जी यांना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नियुक्त केले. बाबासाहेब पठारे 2006 पासून दिवंगत नेते स्वर्गीय रामविलाश पासवान यांच्या सोबत राष्ट्रीय लोक जनशक्ति पार्टी मध्ये लेबर सेल चे प्रधान महासचिव म्हणून काम करत होते. ते कामगारांच्या समस्या सोडवून त्यानां न्याय देण्याचे काम करत होते. मुंबई व दिल्ली मध्ये रिटायर्ड अंशकालीन पेंशन कामगार आंदोलनात त्यांनी प्रमुख भूमिका निभावली होती. महाराष्ट्र नागपुर , चंद्रपुर , यवतमाल , वर्धा च्या कोळश्याच्या खाणी मध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या समस्या सोडवून न्याय दिला. जनशक्ति रेल्वे कुली यूनियन साउथ सेंट्रल जोन चे झोनल प्रेसीडेंट आहेत. रेल्वे कुली बंधूंना ग्रुप डी मध्ये समाविष्ठ करण्यात यावे त्या साठी प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रीय लोक जनशक्ति पार्टी ( पशुपती कुमार पारस गट) चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष sc & st चे ते अध्यक्ष राहिलेले आहेत. Sc व St कायदा कडक व्हावा व महाराष्ट्र मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळे मागासवर्गीय समाजाला कर्ज मिळण्या संदर्भात मागण्या , तसेच कामगारांच्या समस्या , आणि महाराष्ट्र तील विविध समस्यां चे निवेदन महाराष्ट्र चे महामहिम राज्यपाल महोदय यांना भेटून चर्चा केली होती. राष्ट्रीय लोक जनशक्ति पार्टी महाराष्ट्र प्रदेश तर्फे कार्यकर्त्यांना घेऊन बिहार बौद्धगया बिहार मुक्ति आंदोलन केले आहे. जयबिरसा मुंडा आदिवासी युवा संघटन (जयस) सामाजिक संघटन च्या माध्यमातून आदिवासियांच्या समस्या व हक्का साठी च्या आंदोलन ते सक्रिय आहेत. आदिवासींचा विकास व्हावा म्हणून ते लढा देत आहेत. पठारे राष्ट्रीय व राज्य स्थरावर जवळपास 30 वर्षांपासून फूले शाहू आंबेडकर चळवळीत काम करत आहेत. पठारे यांच्या जवळ भरपूर अनुभव असल्यामुळे ते पक्ष संघटन मजबूत करून तसा अहवाल तीन महिन्यात राष्ट्रीय कार्यकारणी ला देणार आहे. लवकरच ते महाराष्ट्र मध्ये जिल्हा अध्यक्ष च्या नियुक्त्या करणार आहेत. पठारे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बनल्या पासून त्यांच्या जुन्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन महत्वाचे पद देऊन नियुक्त्या दिल्या आहेत.त्यांचे जुने सहकारी शिवाजीराव झोडगे पाटील यांना महाराष्ट्र प्रदेश महासचिव नियुक्त केले आहे , मुंबई चे नितीन झेंडे यांना मुंबई प्रदेश अध्यक्ष नियुक्त केले आहे , मुंबई अंधेरी चे संजय वाघ यांना मुंबई सचिव नियुक्त केले आहे , नांदेड चे खैय्युम खान यांना महाराष्ट्र उपाध्यक्ष नियुक्त केले आहे , नागपूर चे भावठाणकर साहेब यांना महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष नियुक्त केले आहे, कोल्हापूर चे बाबासाहेब भोसले यांना महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष नियुक्त केले आहे , यवतमाळ चे सलीम काजी सर यांना विदर्भ प्रदेश अध्यक्ष नियुक्त केले आहे , पुणे येथील धुराजी शिंदे यांना पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नियुक्त केले आहे , जलगांव चे राहुल सिरसाट यांना उत्तर महाराष्ट्र (खांदेश) प्रदेश अध्यक्ष नियुक्त केले आहे , लवकरच महाराष्ट्र प्रदेश ची मीटिंग चे आयजेन करून महाराष्ट्र मध्ये आदरणीय नेता मा. श्री. उपेंद्र कुशवाह यांचे विचार जनते मध्ये पोहचविण्याचे काम करणार आहात आणि राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टी चा प्रचार और प्रसार संदर्भात सदस्य अभियान सुरू करणार आहोत. सर्व समाजातील कार्यकर्तांनां सोबत घेऊन एक मजबूत संघटन बनविण्याची रणनीति तैय्यार केली आहे. 1 मे 2026 पासून महाराष्ट्र चा दौरां सुरू करणार आहे. तसे नियोजन केले आहे. पठारे राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टी के प्रदेश अध्यक्ष बनल्यामुळे त्यांचे सर्व वर्गा नी शुभेच्छा दिल्या आहेत. यामध्ये सुधाकर मकासरे , सतीश बनकर , सुनील औचरमल , जवाहर भगुरे , हौशिनाथ जाधव , राजू सालवे , सुनील सोलस , नीलेश भालेराव इत्यादी कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ एप्रिल २०२६

## महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने 'नेशन बिल्डर' - प्रा. संतोष विरकर यांचे प्रतिपादन



**कन्नड (प्रतिनिधी) :** येथील शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त "महात्मा फुले यांचे विचार आणि वारसा" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक तथा प्रा. संतोष विरकर यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्रा.संतोष विरकर म्हणाले की, महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने देशाचे 'नेशन बिल्डर' म्हणजेच राष्ट्रनिर्माते होते. त्यांनी वयाच्या २१ व्या वर्षापासून सामाजिक समता, बंधुता आणि मानवता प्रस्थापित करण्यासाठी अविरत संघर्ष केला. सर्व दुःखाचे मूळ अज्ञान हे आहे. त्यांच्या जीवनचरित्रातून स्वाभिमानाने कसे जगावे, याचे मार्गदर्शन मिळते. त्यांनी तब्बल ४२ वर्षे मानवी मूल्ये आणि मानवतावाद रुजविण्यासाठी समर्पित केली. तसेच, स्वतःची सर्व संपत्ती त्यांनी सामाजिक कार्यासाठी उदार अंतःकरणाने खर्च केली. आजच्या काळात मात्र महामानवांना जाती-जातीत विभागले जात असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी सांगितले की, शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांची महान गुरु-शिष्य परंपरा जपणे आवश्यक आहे. जाती-धर्मातील भिंती दूर केल्यास देश एकसंघ, सार्वभौम आणि मानवतावादी राष्ट्र म्हणून उभा राहील, आणि तोच खऱ्या अर्थाने विकसित भारत असेल. विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांच्या विचारांची जाण निर्माण करणे आवश्यक असून, शिक्षणाचा खरा अर्थ म्हणजे सत्य-असत्य ओळखण्याची क्षमता विकसित करणे होय, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले सर हे होते. अध्यक्ष समारोप करताना ते म्हटले की, "महात्मा फुले यांच्या द्विशतकीय जयंतीच्या पार्श्वभूमीवर आपण महात्मा फुले यांना अभिप्रेत असणारी समाजव्यवस्था आणि "विश्व कुटुंबकाची संकल्पना " प्रत्यक्षात आणायला हवी. शाळा महाविद्यालय आणि सेवाभावी संस्थेने यासाठी प्रयत्न करायला हवेत. आपण महापुरुषांना जर जाती-जातीत वाटून घेतली तर येणारा काळ आणि पिढी आपल्याला माफ करणार नाही. याची जाणीव सर्व समाजाने ठेवली पाहिजे. 'आपले पोट भरलेले असताना समाजाच्या वेदना समजून घेण्याची प्रवृत्ती सर्वश्रेष्ठ प्रवृत्ती असते ' हे महात्मा फुले यांच्या समग्र जीवन चरित्र व वाङ्मयातून आपल्याला शिकायला मिळते." असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. बी. के. मगरे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रकाश खेत्री यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. डी. डब्ल्यू. शिंदे यांनी केले आणि आभार डॉ. एस. एम. पवार यांनी मानले.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात महात्मा फुले यांची जयंती साजरी



**उमरगा : (प्रा.नागसेन कांबळे)** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या सभागृहात राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित आधुनिक कवितेचे जनक ,आधुनिक भारताच्या सत्यशोधक समाजाचे निर्माते "ब्राम्हणांचे कसब" शेतकऱ्यांचा आसूड लिहून लाखो बहुजन समाजासाठी शिक्षणाचे द्वार खुले करणारे व बुवाबाजी, अंधश्रद्धा, कर्मकांड ,अनिष्ट रूढी आणि परंपरावर आसूड ओढणारे आद्य समाजक्रांतीकरक महात्मा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.गुलाब राठोड प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. रमेश मांदळे , प्रा. डॉ.आसिया चिश्ती , प्रा. डॉ महादेव खोत हे होते. प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून प्रमुख उपस्थितांच्या हस्ते वंदन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी भारतात पहिल्यांदा छत्रपती शिवाजी महाराजांवर पहिला कुळवाडी भूषण पोवाडा लिहिणारे, व छत्रपती शिवरायांची समाधी शोधून काढणारे आणि शिवछत्रपतींची पहिली सार्वजनिक जयंती साजरी करणारे महात्मा फुले असा उल्लेख करून महात्मा फुले यांचे भारतीय समाजरचनेत त्यांनी दिलेले योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली. भारतीय राष्ट्रनिर्माणात महात्मा फुले यांचे समर्पण अतुलनीय असून शिक्षणाविषयीचे त्यांचे अमूल्य विचार समजून सांगितले.प्राथमिक शिक्षण मोफत असावे व त्याचबरोबर शिक्षण हे व्यावहारिक ज्ञान व व्यावसायिक कौशल्यावर आधारित असावे असा विचार त्याकाळात मांडलेला होता याची आठवण करून देत आजही समकालीन जीवनात त्यांच्या विचारांची अद्ययावतता किती अतूट आहे हे सप्रमाण प्रतिपादन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपानंतर प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

## देवगिरी किल्ला पाहण्यासाठी राष्ट्रपतींच्या स्वीय सहायकांची खास भेट



**दौलताबाद (जावेद अहमद) :** येथील देवगिरी किल्ल्यास राष्ट्रपती चे स्वीय सहायक विदिशा मैत्रा व त्यांचे पती मयंक सिंग सहसचिव परराष्ट्र मंत्रालय या दाम्पत्याची देवगिरी किल्ल्यास भेट देऊन देवगिरी किल्ल्याची संरक्षण व्यवस्था आणि देवगिरीचा ऐतिहासिक वारसा समजून घेतला.यावेळी त्यांना मार्गदर्शक शेख जावेद यांनी पर्यटन मार्गदर्शन केले.किल्ला पहातेवेळी त्यांनी हा किल्ला जागतिक पर्यटन किल्ल्याच्या यादीत यायला हवा आणि येथील वैभव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचायला हवं अशी व्यवस्था येथील पर्यटन व्यवस्थेने करायला हवी असे प्रतिपादन केले.देवगिरी किल्ला हा जगातील अजिंक्य किल्ल्यापैकी एक असून याची माहिती व प्रचिती या ठिकाणी आल्यावरच मिळते असेही त्यांनी नोंदवही मध्ये नोंद करताना म्हटले कुठलाही डाम डौल अथवा सुरक्षा न घेता स्वच्छंदपणे त्यांनी या किल्ल्याची बारकाईने माहिती घेतली येथील किल्ल्याची संरक्षण भिंत चांदमिनार व येथील परिसरातील तोफा आणि खंदक याची व अंधारी मार्गाची माहिती घेतली त्यांच्या मनात असलेली उत्सुकता कुतूहल पाहून हा किल्ला अद्भुत आहे इथला परिसर आणि या किल्ल्याचा इतिहास असे शब्द व्यक्त केले.यावेळीमहसूल अधिकारी सूरज गिरी कर्मचारी मिलिंद साठे यांची प्रमुख उपस्थिती होती

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ एप्रिल २०२६


# सिम्बॉल ऑफ नॉलेज



**भा**रतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्याचा दिवस म्हणजे 14 एप्रिल. या युगप्रवर्तकास माझे कोटी कोटी प्रणाम. कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी मोठे ध्येय व स्वप्न पाहता येतात, नव्हे प्रत्यक्षात सत्यात उतरवता येतात याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणून आज आपण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे बघून म्हणू शकतो. समाजामध्ये वाढत चाललेली सामाजिक विषमता, श्रद्धा आणि अंधश्रद्धे मध्ये अधिकाधिक गुरफटत जाणारा समाज, बुवा बाबांचं आलेलं पीक या सर्व पार्श्वभूमीवर आज खऱ्या अर्थाने बाबासाहेबांच्या विचारांचा जागर होण्याची आवश्यकता आहे. जगातील सर्वात मोठी आणि महान लोकशाही म्हणून भारताकडे आदराने पाहिले जाते. त्याचे सर्व श्रेय भारतीय घटनेला आणि तिच्या घटनाकारांना जाते. पण मित्रांनो जोपर्यंत आपल्याकडे सुशिक्षित आणि सुसंस्कारित मानवधन तयार होत नाही, तोपर्यंत या संविधानाचा अर्थ सोयीप्रमाणे लावला जाईल. विवेक, त्याग, प्रामाणिकपणा, निष्ठा, विश्वास, प्रेम, जिव्हाळा, सहिष्णुता याने युक्त असे मानवधनच लोकशाहीचा उत्तम विकास घडवू शकेल. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समाजवाद या मूल्यांची जोपासना करत भारतीय नागरिकाला त्याचे मूलभूत अधिकार व कर्तव्य ज्या दिवशी मिळाली तो दिवस म्हणजे 26 नोव्हेंबर. हा दिवस आपण संविधान दिवस म्हणून साजरा करीत असतो. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना 26 नोव्हेंबर 1949 रोजी संध्याकाळी 5 वाजता त्यावेळच्या भारतीय केंद्रीय मंत्रिमंडळाकडे सुपूर्त केली. या संविधान निर्मितीला सुरुवात जुलै 1946 पासून झाली. संविधान समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद व त्यातील मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. ही राज्यघटना तयार करायला 2 वर्ष 11 महिने 18 दिवस इतका कालावधी लागला. या भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. राज्यघटना बनविताना बाबासाहेबांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला. मानवी जीवनामध्ये शिट्टीचे महत्त्व आहे. शिट्टीचे विविध उपयोग आपल्या सर्वांनाच माहिती आहेत. तिचा उपयोग कधी कुणाची छेड काढण्यासाठी, कधी वर्गातील बिघडलेले वातावरण शांत करण्यासाठी, तीच शिट्टी हवालदाराकडे असते तेव्हा ती अनेकांना सूचना देण्याचे काम करते, शिक्षकांकडे असणारी शिट्टी, सुरक्षा रक्षक यांच्याकडे असलेली शिट्टी ही सावध करण्यासाठी, लक्ष वेधून घेण्यासाठी, गडबड गोंधळ शांत करण्यासाठी होतो, शालेय जीवनात स्काऊट गाईड सारख्या अनेक विषयांमध्ये शिट्टीचे विविध उपयोग सुचविण्यात आलेले आहेत. ज्याप्रकारे तिचा उपयोग हे त्या शिट्टी वापरणाऱ्या व्यक्तीच्या उद्दिष्टानुसार किंवा हेतूनुसार आपणास दिसतो त्याच प्रकारे आपली राज्यघटना सुद्धा किती उपयुक्त बनलेली आहे? याचे उत्तर देताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असं म्हणाले, ती वापरणारी माणसे ज्या प्रकारची आहेत ते ज्या उद्देशाने तिचा वापर करतील, ज्या हेतूने तिचा वापर करतील त्या प्रकारे संविधान आपली उपयुक्तता वेळोवेळी सिद्ध करेल. मित्रांनो आज आपण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला किंवा महापरिनिर्वाण दिनी हार, गुच्छ, नाच, गाणी, मिरवणूका यांचा समावेश मोठ्या प्रमाणात करतो. ते सर्व चित्र बघून एक शिक्षक म्हणून मला वाटतं की बाबासाहेबांना खरंच हेच हवे होते का? अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाच्या परिसरात बाबासाहेबांचा पुतळा असून त्या पुतळ्याखाली 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' असे लिहिलेले आहे . अमेरिकेत ते ज्या कोलंबिया विद्यापीठात शिकले तेथे त्यांचा उल्लेख 'ज्ञानाचे प्रतीक' म्हणून होतो. पण खुद्द त्यांच्या मातृभूमीत त्यांना हे स्थान आहे का? याबद्दल माझ्या मनात निश्चितच शंका आहे? जातीअंता बद्दल त्यांची असलेली भूमिका, सामाजिक विषमता, आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न या संदर्भात आज आपण नक्की काय करत आहोत? जातीअंताची, सामाजिक विषमतेची, आर्थिक विषमतेची आजची स्थिती काय? यावर विचार करताना मनात विचारांचे काहूर माजल्याशिवाय राहत नाही. बाबासाहेबांनी समाजातील अमानुष प्रथां विरुद्ध आवाज उठवला. मूकनायक, प्रबुद्ध भारत, जनता, समता, बहिष्कृत भारत या सारखी अनेक नियतकालिके त्यांनी सुरू केली. या नियतकालिकांच्या माध्यमातून त्यांनी समाजातील कुप्रथा, सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, स्त्री-पुरुष विषमता, शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, शिक्षण विषयक विचार, स्त्रियांच्या हक्काचे प्रश्न, राजकीय प्रश्न यावर प्रकाश टाकला किंबहुना वर्तमानकालीन आपल्याला भेडसावत असणाऱ्या प्रत्येक समस्येवर बाबासाहेबांनी त्यांच्या लेखणीतून त्यावेळेस प्रकाश टाकलेला दिसून येतो. आंबेडकरांनी त्यांच्या अनुयायांसह अनेक कुप्रथांना कारणीभूत ठरणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले. गावातील सार्वजनिक पाणवठ्यावर दलितांना पाणी मिळावे म्हणून महाड येथील चवदार तळ्यावर त्यांनी सत्याग्रह केला. दलितांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून नासिक येथील काळाराम मंदिरात सत्याग्रह केला. सरकारच्या गोलमेज परिषदांमध्ये भाग घेतला. गोलमेज परिषदां द्वारा सरकारने दलितांना 78 स्वतंत्र मतदार संघ दिले. महात्मा गांधींच्या मते ही हिंदू धर्मात फूट पाडण्याची ब्रिटिशांची कुटनीती आहे. याविरुद्ध त्यांनी येरवडा तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले. तेव्हा अत्यंत उदार अंतकरणाने महात्मा गांधीजीं सोबत पुणे करार करून स्वतंत्र मतदार संघा ऐवजी राखीव 148 जागा बाबासाहेबांनी स्वीकारल्या. स्वतंत्र भारताचे ते पहिले कायदा व न्याय मंत्री होते. 1956 मध्ये त्यांनी आपल्या हजारो अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला. आपली राज्यघटना ही खरोखर किती परिपक्व आहे? याचे उत्तम उदाहरण म्हणजे, आपल्याला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे. पण भारतीय लोकशाही दिवसागणिक परिपक्व होताना दिसते. तेच आपल्या शेजारील राष्ट्रांमध्ये लोकशाही बद्दल वेगळेच चित्र बघावयास मिळते. यावरूनच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे काय क्षमतेची दूरदृष्टी होती याची कल्पना येते. म्हणूनच माझ्या मते खऱ्या अर्थाने त्यांना महामानव का म्हणतात याची प्रचिती येते. दुर्दैवाने म्हणावे लागते की ब्रिटिशांनी या देशात जात, धर्म, पंथ, स्त्री, पुरुष या सर्व प्रकारचे भेदाभेद पार करीत सार्वत्रिक शिक्षणाला सुरुवात केली. जर या देशावर इंग्रजांचे राज्य नसते तर कदाचित भीमराव रामजी आंबेडकर या विद्यार्थ्याला शिक्षणही घेता आले नसते. जेव्हा ते शिकत होते तेव्हा सार्वजनिक पानवठयावर त्यांना पाणीही मिळत नव्हते. त्यांचे वडील त्यावेळी लष्करात सुभेदार पदावर होते. राहायची जागा गावकुसाबाहेर होती. तरीसुद्धा या महामानवाने आपल्या संपूर्ण देशाला प्रेम, प्रज्ञा, समता, बंधुता व करुणेचाही वारसा दिला, राज्यघटनेचाही वारसा दिला व हिंदू कोड बिलाचाही वारसा दिला. राज्यघटना सर्वसामान्य माणसाने का समजून घ्यावी, संपूर्ण भारतीय नागरिक होण्यासाठी आपण आपल्या देशाची राज्यघटना वाचणे व समजून घेणे आवश्यक आहे. जर राज्यघटना आपल्याला समजली तर एक गोष्ट मी निश्चितपणे सांगू शकतो की तुमच्यावर कोणीही, कोणत्याही प्रकारचा अन्याय करू शकणार नाही. तुम्हाला सर्व प्रकारच्या अन्यायाविरुद्ध कायदेशीर बळ देणारी ही आपली राज्यघटना आहे. संविधान दिन आपण 26 नोव्हेंबर 2015 पासून साजरा करण्यास सुरुवात केली. भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 125 वी जयंती साजरी करत असताना त्यांना एक प्रकारे श्रद्धांजली म्हणून हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. 26 नोव्हेंबर 1949 या दिवशी बाबासाहेबांनी संविधानाचे कामकाज ठरवून पूर्ण केले. सर्व जात, धर्म, पंथ, स्त्री, पुरुष कायद्यासमोर समानतेचा संदेश देणारे, सगळ्यांना कायद्याचे समान संरक्षण देणारे, राज्य कायद्याचे असेल, कुणालहरी व्यक्तीचे किंवा हुकूमशहाचे नसेल. पण समाजामध्ये मोठ्या प्रमाणात संविधानाबाबत अनभिग्यता असल्यामुळे अन्याय करणाऱ्यांची व अन्याय सहन करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. हे थांबवायचे असेल तर राज्यघटना अभ्यासलीच पाहिजे. दहशतवाद, राजकारणातील अराजकता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, तरुण पिढीचा बेदरकारपणा, भ्रष्टाचाराला प्राप्त झालेली सामाजिक मान्यता, रस्त्यारस्त्यावर होणारे गटागटातील संघर्ष, लहान - सहान कारणांसाठीही होणाऱ्या समाजातील हत्या, शब्दा - शब्दाने पेटणारे रणकंदन, राजकीय लोकांची शिवराळ भाषा, इतिहासाचे विडंबन, राष्ट्रपुरुषांची अवहेलना यामुळे संविधानातील सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जा व संधीची समानता; हे सर्व भासमान वाटतंय. खरंच प्रत्येक व्यक्तीला हे अधिकार मिळाले तरच या युगप्रवर्तकाची जयंती आपण खऱ्या अर्थाने साजरी केली असे म्हणता येईल.


**लेखक**

**प्रा. प्रशांत पुंडलिक शिरूडेके.**

**मो.** 9967817876

**prashantshirude1674@gmail.com**


## ज्ञान क्रांतीची मशाल

ज्ञान क्रांतीची मशाल पेटवून
बहुजनांना दिशा दाखविले
ज्ञान ज्योतीच्या प्रकाशाने
साऱ्या समाजास जागविले

स्त्री जातीची शक्ती ओळखून
प्रथम शिक्षण केले खुले
म्हणून ज्ञान दैवत आमचे
क्रांतीज्योती महात्मा फुले

बहुजनांच्या जीवनातले
अज्ञानाचे गमक हेरले
हाती घेऊन ज्ञान मशाल
ज्ञानप्रकाश तुम्ही पेरले.

अज्ञानातील बहुजनांना
ज्ञानाचा मार्ग दाखविले
बहुजनांच्या मुलामुलींना
शाळा काढूनी शिकविले

विरोधकांचे बंड जुगारून
बहुजनांना तुम्ही तारले
बहुजनांच्या जीवनातले दु:ख
ज्ञानक्रांती करून दूर सारले

क्रांतीसुर्याच्या तेज प्रकाशाने
बहुजन प्रकाशमान झाले
गुलामांच्या जीवनात आज
क्रांतीसुर्याचे प्रकाश आले




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## उंदीरमामा

उंदीरमामाने घातला
सुट आणि कोट
पायात घातला
कोल्हापूरी बूट

खिशात ठेवली
दहाची नोट कोरी
रुबाबात निघाली
बाजारात स्वारी

उंदीरमामाने घेतला
पांढरा टुथपेस्ट
चव घेत म्हणाला
आहे की बेस्ट

नंतर उंदीरमामा
हॉटेलात शिरला
गरम-गरम भज्यांनी
खिसा भरला

उंदीरमामाने काढले
खिशातून आठाणे
विकत घेतले
गरम-गरम फुटाणे

उंदीरमामाला बाजारात
दिसली मनीमाऊ
घराच्या दिशेने
मामा लागले धावू




**- रविंद्र व्ही. चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.9011559106**


## ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्सहात साजरी



**बाजार सावंगी :** ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री झिंजूर्के सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. यावेळी प्रा. राणे सर, श्रीमती पारनेरे मॅडम, प्रा. पवार सर, प्रा. राठोड सर, श्रीमती कुलकर्णी मॅडम, प्रा. चव्हाण सर, प्रा. पाटील सर, प्रा. गायकवाड सर,श्रीमती जाधव मॅडम,प्रा. गाडेकर सर,प्रा. कुवारा सर,श्री. जाधव सर, श्री. कोलते सर, श्री. जाधव सर उपस्थित होते.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ एप्रिल २०२६

# ।।'भंग-अभंग' आणि 'फुटूच लागतात पंख' : वेगळे काव्यभान।।

'भंग- अभंग' आणि 'फुटूच लागतात पंख' हे सुधीर देवरे यांचे दोन कवितासंग्रह (निवडक कविता- 347) 2022 साली प्रकाशित झाले आहेत. या संग्रहांमध्ये 1980 ते 2021 या कालावधीतील लिहिलेल्या कविता आहेत. वयाच्या सतराव्या वर्षापासून ते आजवर कविता लिहीत आले आहेत. कविता सातत्य आणि सर्व विषयस्पर्शीत्व त्यांच्या काव्य-घडणीचे विशेषत्व आहेत. फक्त 347 कविता या दोन्ही कवितासंग्रहांमध्ये असल्या तरी पुस्तक रुपात न आलेल्या आणि एकूण कवितांमध्ये न निवडलेल्या कवितांची संख्या खूपच अधिक असण्याची शक्यता आहे. वस्तुत: समग्र कविता याव्यात अशी अपेक्षा आपण ठेवतो. कारण म्हणजे असलेल्या कवितांमध्येच खूप कुतूहल निर्माण होते, सर्जनक्षमतांचा अंदाजही येतो. 'माझ्या आत्मनिष्ठ जीवन जाणिवांचा वस्तुनिष्ठ अविष्कार' हा कवीने स्वत:पुरता निकष मानला आहे. कविता हा साहित्यप्रकार आत्मनिष्ठ जाणिवांचा आविष्कार असतो ही धारणाही बरोबरच आहे. आविष्कार या संकल्पनेत रचनाबंध आणि सौंदर्यतत्व अनुस्यूत आहेत, असावे. सौंदर्याविष्कार व्यक्तिनिष्ठ की वस्तुनिष्ठ असे प्रश्नही निर्माण होतात. वास्तवसंबंध-वास्तवसंबध्दता, हुबेहुब वर्णन, संख्यात्मकता, तपशिलांची यथातथ्यता असे काही अर्थविस्तार 'वस्तुनिष्ठ'चे होतात. अर्थातच स्वभावोक्ती ही वस्तुनिष्ठता दर्शक उक्ती आहे. ज्ञान, विज्ञान, गणिती क्रियांच्या बाबतीतही वस्तुनिष्ठता अपेक्षिली जाते. आविष्कारांच्या बाबतीत असे मानता येईल की येथे कवीची भूमिका केवळ वस्तुनिष्ठतेच्या पलीकडे झेपावणारी असावी, आहेही! ध्वन्यर्थ, व्यंग्यार्थ, बहुअर्थकता, विरोधाभासात्मकता असेही काही निकष कवितेच्या बाबतीत स्वीकारले जातात. आत्मनिष्ठ जाणिवांमध्येच कवीस्वभाव- कविसंवेदन यांचा समावेश असतो. वस्तुनिष्ठ जगाचे- स्थितीचे- काळाचे कवीचे आकलन आविष्कृत होताना काव्यात्मकतेचा प्रवेश घडून येतो. वस्तुनिष्ठ तपशील आत्मनिष्ठता धारण करू लागतात. तेव्हा समाज, व्यक्ती, भौतिकविश्व, बाह्यघटिते, आंतरिक भाव-चाली- हालचाली शब्दस्वरूप अनुभवात संक्रमित होताना काव्यविष्कार / आत्मनिष्ठ जाणिवांचा आविष्कार / मी चे भाव संवेदन प्रकट होते. या अर्थाने 'वस्तुनिष्ठ आविष्कार' या संकल्पना-निकष कवीने केलेला असावा.।। २ ।।

कवीला कविता कोठे सापडते? सापडली आहे? या प्रश्नाचा विचार केल्याबरोबर काव्यस्मृतीचे स्थल, घटना, व्यक्ती, परिस्थिती, भौतिक संघर्ष यांचे तपशील समोर येतात. उदाहरणार्थ, 'कविता मला सापडते' मधील तपशील पाहा. (फुटूच / पृ. 138 — 142)

गल्लीबोळ, चावड्या, ओटे, रस्ते, निंदानालस्ती करणारे टोळके, भाजी बाजार, जत्रा, घरे, बायाबापड्या, सिरीयल्स, आर्थिक सुबत्ता, शहाजोग माणसे, राजकीय शिक्षण सम्राट, कर्मवीरांचे समाजकारण, लाच देणारे- घेणारे, विचारवंत, कुत्री डुकरे यांची कॉलनी, रस्त्यावरचे खड्डे, थुंकणे, तुंबलेली गटारे, कचरा कोंडी, दुर्गंधी, डोंगराळ गुहेतील थंडावा, एकाकीपण, अस्वस्थ शांतता, फुलवलेली झाडे झुडपे, मूक किंकाळ्या, साधे शब्द, निरर्थक जगणे, असुरक्षित असमाधानी नोकरी, जगतानाचे ताण, फेसबुक फोटो, पोस्ट-मजकूर, लाईक्स, व्हाट्सअॅप संदेश, गटतट- ग्रुप चॅटिंग, चित्र, तुरुतुरु चाल, मान वेळवणे, सामसूम वेळ, काकडलेला पोलिओ पाय- अक्राळ वेदना, आतल्याआत रडणे, मानेवर जू घेऊन नोकरी करत हसणारी वैदेही, रहदारीतल्या अपघातात, चाकोरीबाह्य पुस्तक, थरकाप-धाप सावरणे, एखाद्या अक्षरात, एखाद्या शब्दात, सळसळती ऊब- वीज, अट्टल चोरासारखे निसटणे, न शब्दबद्धात, डोळे-डोके- काळीज, अमूर्त अदृश्य दृगोचर, साहित्य, ग्रंथ, न वाचलेले पुस्तक, नियतकालिक, कवी संमेलन, हमरस्ते, वाहन रांगा, रक्तबंबाळ अपघातग्रस्त, शहरी टॉवरखाली, मातीचे चेंदामेंदा होऊन कण्हणे, कपाळावरच्या आठ्या, सांकेतिक धारदार नजर, हळूवार बोली, देहबोली, नि:शब्द आवाज, श्वासनिश्वास, विलंबित काळ, सुस्कारे, धंद्यात तरबेज दोघे, नकोशी स्वप्ने, हवीशी परिकथा, कल्पनेत जुगणे, लैंगिक समाधान, न वाचता येणारी न सापडणारी, ठेच लागणे, कॅमेऱ्याच्या फोटोत, पलायन- स्थळ, इतरांच्या भोगलेल्या कविता, व्यथा इत्यादी स्थळे-घटिते- प्रसंग अशी तपशिलांची यादी येते. अर्थात या वास्तवसंबंध्द तपशीलांमध्ये व्यथा- वेदना यांचे क्षण काव्यस्फुरणात कारणीभूत ठरत असावेत. भौतिकातले-मानस पातळीवरचे हे सारे अभाव- वंचना पाहून- अनुभवून- कल्पून कवितानिर्मिती हा कवी करतो. जवळपास जगण्यातल्या-सभोवतालातल्या सर्वच दुखऱ्या जागा / विषय 'दृगोचर' (हा कवीचा आवडता शब्द आहे) करणाऱ्या या कविता आहेत. शिवाय — 'कवी असलं म्हणजे / शब्द लिहिलेच पाहिजे का / कागदावर...' अशी शब्दातीत कविताही कवी कल्पितो. रांगा लावून कविता म्हणणाऱ्यांची दखलही घेतो. आविष्कारांमध्ये न सामावणारा भरपूर सूचक आशय / विषय या कवीच्या भावविश्वात आहे. 'तू डंख मारावा / आणि मला कविता व्हावी' असेही क्षण- स्थिती बहुसंख्य कवितांमध्ये आहे. सर्जनशीलता नसलेली कविता 'हस्तमैथुनासारखी' ठरवलेली आहे. जबरीने वंध्यामैथुनातही निरर्थकता कवी सुचवतो.

'डंख- विष- सर्प' या शब्दांमध्येच एक प्रकारची तीव्र खोच आहे. लोक, कवी, लेखक, शासक वगैरे लौकिक जगण्यातले अनुभव कवीला विषण्ण करतात, हे सारे भोंदू अन्यायकारी- दमनकारी जसे आहेत तसेच कामांध आहेत. हे सावजावर हल्ला करतात, जखमी करतात त्याप्रमाणे तृष्णाही वाढवतात. कामदमन आणि जखमा यांचेच हे शब्द सूचक असावेत. लोकानुभव वा कामानुभव वेदनाकारक ठरले आहेत / ठरवले आहेत. काही उदाहरणे पाहा : 'भंग-अभंग' मध्ये हे उल्लेख आधिक्याने येतात- * कोणत्याच नागाला फणा काढून घुसता येत नाही बिळात. (भंग — 158)* नागोबा रोज ओकतो पावशेर दूध आणि थकून आपोआपच झोपून जातो सवयीच्या बिळात. (भंग- 156)* नागोबाच्या फण्यावरची कात मागे सरकवून घ्यावी / लालभडक डंख उमळून (भंग- 155)* सापाच्या जागी जसा भुजंग वापरता येणार नाही / तसा भुजंगाच्या जागी साप (भंग- 148)* साप नाजूक असतो दुरूनच चकाकतो कातीचाही सोसवत नाही भार (भंग- 135)* तर जळत राहा गंधकासारखा पेट घेत वेटाळणाऱ्या सापांसह (भंग- 128)* तुझे बोल नाहीत ते फुत्कारच होते / सर्वांगात भिनत गेलं विष (भंग- 199)* अशा साप सुरळ्या गल्लोगल्ली मुरळ्या पाण्यातलं ते इरोळं (भंग- 115)* (औदुंबर) पाय घसरून पडला तर थेट काळ्या डोहातून नागलोकात (भंग-109)* आपण साप पाहत नाही / सापाचं प्रेत पाहून सापाबद्दल बोलतो / आणि सिद्ध करतो / आपलं पुरुषत्व खडकाळ भाषेत (भंग- 103) * एकदा गरळ ओकली / की दिवसभर / संधी येऊनही / डंखत नाही नाग / जरी बेडकीची / डरावडराव (भंग- 101) * तू नागाला घालते हात (भंग- 100)* डसत डसत / डंख / खुळखुळा / मोकळा... (भंग- 72)* साप नाही बाप नाही / घोरतं ते काय (भंग- 66)* सगळे अभंग / सर्वदूर भंग / डंखलेलं अंग / भेगाळलं (भंग-65)* प्रत्येक सापात / जसे नसते विष / तशी माणसात / माणुसकीही (भंग- 51)* मुकुटाचा फणा / स्पर्शताच माना / कौपुर घोळणा / फट्ट फुटे (भंग- 50)* रोज रोज / फणा किती / दंशालाही / आट आहे (भंग- 49)* फाक्या झ्याप / खड्या जाग / जखमी साप / चावेल किती (भंग- 49)* सर्प म्हणे असा आनंदाचा खेळ / सगळीच बिळं / मालकीची (भंग- 46)* डंख व्यालेल्या अवकाशातून बाहेर पडायचं आहे (फुटूच- 57)* सापाकरता मुंगूस यावा ना लाल / पण इथं बोगदेच येतात पाठोपाठ * शेपटीवर पाय पडलेल्या / सर्पासारखा / डंख माराल आदिम बोलीत (फुटूच- 108)* नाग निघाला असा गं बाई (फुटूच- 109) * फुत्कार (फुटूच- 110)* सापाची विजुगीषा / कावळ्याची गर्जना / आणि लांडोराची प्रतिभा / पळवून (फुटूच- 114)* गव्हाचं माप / हवासा ताप / दंशतो साप / टपोरसा (फुटूच- 124)

'साप- दंश' हे शब्द / प्रतिमा, वासना- विकार यांचे संसूचन करतात. 'विष- दंश' बहुदा वेदना देणारे- जखमा करणारे लोक-अनुभव यांचेच निदर्शक म्हणून येतात. 'कीटक- पशू- प्राणी' हे विकारी घटक / घटिते आहेत. 'कामदमन' किंवा 'सुविहितता- खंडितता' यांचा संबंध वरील उल्लेखांच्या बाबतीत जोडता येऊ शकतो.।। 3 ।।

विसंवादांशी संवादी होता न आल्याने हतबलता आणि रागावणे या भावस्थितीच्या घटना- प्रसंगही येथे कवितारूप धारण करतात. लोकस्वभाव तापदायक असणारे हरगडी अनुभव कवीला येतात. अभावांची तीव्रता लक्षात येते, लोकस्वभाव तिरपागडा व स्वार्थी असण्याचे आत्मक्लेशाचे क्षण या कवितांचे एक आशय सूत्र आहे. उदाहरणार्थ, अनेक गोष्टी जमत नाहीत मला / आणि अनेक समजत नाहीत कला / समजत नाहीत एकूणएक कविता... मला बोलता येत नाही / तडकाफडकी इंग्लिश वेगात... (फुटूच- 107)

सभोवतालच्या काल- स्थल- अवकाशातच काही वैगुण्य आहे आणि त्याचा 'मी'ला त्रास होतो, तळमळ प्रकटीकरणातही बाधा येते, काळाचे अर्थ किंवा व्याकरण दुर्बोध बनतात. 'मी'ची शालिनता- सभ्यता- संयमितता सभोवतालात नाही, काही सुसंगत वास्तव अस्तित्वात नाही म्हणून अतिवास्तवाची भेदक जाणीव या कवितांमध्ये जाणवते. कृमी- कीटक- पशू- साप- घोडे हे पाशवी जगच आपलेसे बनते. विकारांचा उच्छाद सुरू होतो आणि पुढे पुन्हा आत्मक्लेशांकडे कवीचा मानसप्रवाह वाहता होतो. या मानसप्रवाहात चमत्कृती उद्भवतात. शब्द-कल्पना- विचार या बाबतीतल्या चमत्कृती येथील कवितांमध्ये म्हणूनच येत राहतात. काही उदाहरणे पाहा : आयुष्यभर नात्यांची / कलेवर सांभाळत / उत्सवात मिरवावी लागतात / चारचौघात... (फुटूच-151) किंवा रात्री जेवताना चॅनल्ससह पेपर कुरतडत / बेडवर शेड्युल भयानक अर्धवट स्वप्न उबवायची... (फुटूच- 154)किंवा बहर गेला सरून झाडांचा / कोयी वेचित फिरलो / देहाला दुर्लक्षून या / आत्माराम ब्र बनलो... (फुटूच- 88)किंवा या भोकातून पाणी दिसतं / त्या भोकातून गाणी / देता देता बळजबरी- / उचक्या... / उंदीर कैलासवासी! (फुटूच- 61) किंवाचढणाऱ्या नशेसारखे / चाटून जाणारे चुंबकीय स्पर्श / कृष्णविवराच्या ओढीतून / उठून बसलेल्या सरड्यासारखा प्रश्न... (फुटूच- 114)

विरूपणातली चमत्कृती साध्य करणाऱ्या या कविता आहेत. उपरोध किंवा सभोवतालच्या परिस्थितीला- विसंगतींना निस्संदर्भ करण्यातूनही चमत्कृतींचा आश्रय करावा लागला असेल.

या कवितांच्या निवेदकाचा 'अहं'ही फार तेजस्वी आहे, परिस्थिती-विसंगती-विपरित अनुभव या साऱ्यांकडे पाहणारी 'मी'ची दृष्टी उग्रकठोर आहे. विसंगतीची संगती न लागल्याने अधिकच उग्र कठोरता येते. समकालीन मूल्यहिनता, सामाजिक जीवनातील, व्यक्तिगत जीवनातील विसंगती, निसर्गावरील अमानुष आक्रमणे, माणुसकीहिन वर्तनव्यवहार, आंतरमहाजालातील समाजमाध्यमे आणि त्यांचे हिणकस प्रभाव, नव्वदोत्तरीतले दिशाहिन चंगळउत्सव यांचा सामना करताना कवितांमधील 'मी' तीव्रकठोर बनतो. सारा सभोवताल 'मी'च्या नजरेने विचलित केला जातो. 'मी' - इतर, मी- सभोवताल, मी- मी' अशी तुलनाक्षम व्दंव्दे उभारली जातात. म्हणून साध्या साध्या घटनांमध्येही विसंगती शोधण्यात, विसंगतींना चिरफाडत जाण्यात निवेदकाचा तीव्र- सूर- ताल जागा होतो. सूचकता, उपरोध, कल्पकता यांच्याऐवजी शब्दांचा मार देण्याकडे निवेदकाचा कल बनतो. सभोवतालच्या मानवी अमानवी सृष्टीप्रमाणेच दैवी संकल्पना- देव- श्रध्दा यांच्यावरही चमत्कृतींचे आसूड ओढले जातात. निवेदकातल्या कवीला हौस आहे ती 'जागल्या' होण्याची. कवीचे काम जागल्या होऊन स्व-जागृती करण्याचे आहे तसेच ते विश्वालाही जागृत करण्याचे आहे- असे आविर्भाव या कवितांमधल्या 'मी'चे आहेत, असावेत.।। 4 ।।

येथे विशिष्ट क्षण, प्रसंग, विपरीत स्थिती यांना काव्यरूप देताना, तेवढ्या क्षणापुरता शब्दावकाश निर्माण करणारी काही रचनाही आढळते. अकस्मात भावस्थिती खंडित होऊन किंवा चमत्कारासारखी अभिव्यक्ती होऊन भावस्थिती भंग पावते. चकीत करणारे किंवा अनपेक्षित शब्दभंग अवतरतात. विशेषत: 'भंग- अभंग' मधील रचनांमध्ये ही प्रक्रिया अधिक्याने घडली आहे. अनपेक्षित किंवा धक्कादायक शब्दबंधाचे उपयोजन झाल्याने वाचकाला कोडे उलगडण्यासारखे अर्थनिर्णयन करावे लागू शकते, आणखी काही पुढे असावे ते काय असू शकेल याचे अंदाज करताना काव्यानुभवाचे (वाचकाच्या बाजूने) विसर्जन होऊन जाते. शब्दसंहितेत प्रवाही होताना वाचक मनाशी पुढे काय? याच्या अपेक्षा करतो आणि अचानकतेचे शब्दधजय भवानीत श्री.भागवत जाधव यांचा सेवापूर्ती निमित्त सेवागौरवक्के बसू शकतात, शब्द उपयोजनामागील काही सूचक वा हेतूपूर्ण उद्देश असावेत, असेही वाटू शकते! काही अनपेक्षित शब्द उपयोजने पाहा : तुझ्या डोहामध्ये / फिरवतो बोट / तूही खुंटी खोटं / समजते ।। (भंग- 47)आणि शेवटी- आनंदात तुझ्या / माझा बोट वाटा / कंटाळलेल्या लाटा / बोटांसाठी (भंग- 48)डोह —> बोट (आगबोट की शरीराचा अवयव)डोह —> आगबोटशेवटी बोट = शरीराचा अवयव. खुंटी खोटं समजते (तू) - हे कसे काय?

डोहात बोट फिरवल्याचा तुला आनंद झाला पण बोटांसाठी लाटांना कंटाळा का यावा? मग आनंदानुभवाचे काय? असे वाचकाला प्रश्न अंदाजाचे धक्के येथे बसतात. किंवा 'तोका' माझ्याहून तोकडा / आणि मीही इथं फाटका / मागे नाही कोणी बोका / मॅवकरी ।।' (भंग- 48)'तो' आणि 'मी' अशी 'तुलना / स्पर्धा / वैधर्म्यशोध / विषाद' कशासाठी? 'तो- तोकडा, मी- फाटका' हे दोघेही अपूर्ण. मग अचानक विसंगत असा 'तोका'साठी 'बोका' कशासाठी येतो? तो गावकरीसारखा 'मॅवकरी' का? किंवा कधी जुगुप्सादर्शक शब्दउपयोजन होऊन सभोवतालातील अभद्रता दर्शविली जाते. काही उदाहरणे-• आळी शेंबडात फसली / तडफडता निघेना / गिचगिचाट चिकट / उन्हाशिवाय वाळेना (भंग- 85) • स्पर्शात उगमली गंगा / भडवा / सताड आडवा पडला / कमळ घुसळ / खोलात टाकळी / रस्ता फाटत गुदमरला... (भंग- 91) 'गंगेचा उगम' आणि अचानक 'भडवा' प्रवेशित! (अकस्मातता)कमळ घुसळ = रस्ता फाटत गुदमरला; येथे संगती आहे. काठी / कुरूप असो / वा भाटी / वयात आलेल्या वेलासाठी / मानवी / भावते मला / समग्र रेटारेटी... (भंग- 76) 'कुरूप' आणि 'भाटी' यांच्यातले अर्थअन्वय अचानकतेमुळे संभ्रमित करतात. काठी? कसले प्रतीक आहे? 'समग्र रेटारेटी'शी त्या प्रतिकाला संलग्न करायचे काय? शिवाय 'मानवी' हा शब्दबंधही अनपेक्षितपणे शिरकाव करून घेतो. 'मानवी', 'मैथून', 'काठी' यांच्यातले संवादीत्व शोधावे / कल्पावे लागते. अर्थात या कवितांच्या आकलनात वाचकाला जागे ठेवलेले आहे. प्रस्तुत वाचकाला या अनुभवांचे अर्थनिर्णयन पूर्णत्वाने झालेच आहे, असे नाही. वाचक म्हणून अपूर्णत्वही असू शकते. मात्र- या कविता विचारात पाडतात आणि भाषा, प्रतिमा-प्रतिकांचे उपयोजन, कवीमन याबाबतीत चिंतनास अवसर देतात. हे वेगळे काव्यभान आहे.भंग अभंग /

**डॉ. सुधीर राजाराम देवरे**
**सहित प्रकाशन, गोवा / ऑगष्ट 2022,**
**पृ. 177,**
**किंमत : 200 रूपये.**
**डॉ. अेकनाथ पगार**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ एप्रिल २०२६

## अभिवादक समितीच्या अध्यक्षपदी मयूर राठोड, सचिव आकाश बोलधने

**कन्नड (अरुण थोरात) :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक अभिवादक समिती, कन्नड शहर समितीची बैठक संस्थापक अध्यक्ष अशोक वाहूळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत अभिवादक समितीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यात दुसऱ्या वर्षासाठी अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते मयूर राठोड यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी राहुल वायडे व मनोज देशमुख, सचिवपदी आकाश बोलधने यांची निवड करण्यात आली आहे.यावेळी बोलताना संस्थापक अध्यक्ष अशोक वाहूळ म्हणाले की, अभिवादक समितीचे हे दुसरे वर्ष असून, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा आमचा मानस आहे. पहिल्या वर्षी मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या बळावर यंदा अधिक नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यावर्षी मर्यादित स्वरूपात काही उपक्रम राबविण्यात येणार असून, सांस्कृतिक, वकृत्व, चित्रकला, निबंध, रांगोळी तसेच अभ्यास मंच यांसारख्या विविध स्पर्धा पुढील वर्षापासून सुरू करण्यात येणार आहेत. तसेच यंदाही अभिवादक मंच उभारण्यात येणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि आदर्श पिढी घडवणे हा आमचा प्रमुख उद्देश असून, त्यासाठी समिती वर्षभर विविध उपक्रम राबविणार आहे. अभिवादक समितीच्या उर्वरित कार्यकारिणीत कार्याध्यक्ष क्षितिज पवार, अजिक्य बागुल, कोषाध्यक्ष संदीप मनगटे, सहसचिव संतोष भाले गुरुजी व बाळासाहेब आव्हाळे, सरचिटणीस दानिश शेख व सुयोग चोथमल, तसेच सूत्रसंचालक म्हणून अनिल खंबाट यांचा समावेश आहे. तसेच अभिवादक नियोजन समितीमध्ये सदस्य म्हणून टी.बी.पवार गुरुजी, माणिक आबा पगारे, रमेश धनेधर, राजेंद्र भोसले, मोगल वाघ, कारभारी शिरसाठ, नानासाहेब वाळुंजे, विश्वनाथ त्रिभुवन, सिद्धार्थ निकाळजे, संतोष राजे जाधव, कडुबा पवार, रवींद्र जाधव, अजय देशमुख, बाळा जाधव, नाना शिरसाठ, विलास सातदिवे, विनोद कदम, अनिल शिरसाठ, राहुल देहाडे, सुधीर जाधव, गौतम देवरे, अजय सातदिवे, बंटी वाघ, वाल्मिक शिरसाठ, रवींद्र भारुका, हरीश देवरे, प्रशांत मेखे, प्रदीप बोडखे, प्रथम जाधव, पप्पू राठोड, दिपक शिरसाठ, गोकुळ राठोड व बाबा बनकर यांची निवड करण्यात आली आहे.

## ज्ञानदा तंत्रशिक्षण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**कन्नड (अरुण थोरात) :** ज्ञानदा कौशल्य विकास संस्था कन्नड आयटीआय कॉलेज कन्नड येथे द्वितीय वर्षातील इलेक्ट्रिशियन व डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन विदयार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला. विदयार्थ्यांनी यात मनोगत व्यक्त केले, संस्थेच्या प्राचार्या अमृता इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्थाविक केले. यात संस्थेचा प्रगतीचा आलेख त्यांनी सांगितला व मुलांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे यांनी पुढील स्पर्धात्मक अभ्यासाठी, इलेक्ट्रिशियन विदयार्थ्यांना विदयुत सहाय्यक व महापारेशन चे पुस्तकं भेट म्हणून दिली. तसेच कोर्स DMLT च्या विदयार्थ्यांना आरोग्य सेवक ची पुस्तकं भेट दिली. एकूण 100 मुलांना पुस्तकं भेट दिली. विद्यार्थ्यांना ज्ञानाची शिदोरी देऊन एक आधुनिक उपक्रम संस्थेमार्फत राबवण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणपतराव पवार (अध्यक्ष जयलक्ष्मी शिक्षण संस्था ) हे होते. प्रमुख मार्गदर्शक दिपक पवार (रोटरी क्लब अध्यक्ष छत्रपती संभाजीनगर, विदयार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले कि, आपण एक यशस्वी उद्योजक बना प्रॅक्टिकल ज्ञानाचा आपण जीवनात उपयोग करून यशस्वी बना, संतोष मतसागर (उपप्राचार्य विनायकराव पाटील पॉलीटेक्निक कॉलेज कन्नड) यांनीही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले व पुढील शिक्षणासाठी आपणास शिक्षणाचे दारे खुले आहेत. त्यात संधीचे सोने करा असे सांगण्यात आले. सुभाष काळे (भाजपा जिल्हा सरचिटणीस (छ. संभाजीनगर), दिपक वारे (सचिव ज्ञानदीप शैक्षणिक संस्था औराळा), संभाजी मोहिते, नानासाहेब पवार, ज्ञानेश्वर काळे (उपसरपंच चिंचखेडा), भगवान काळे (भाजपा पदाधिकारी) उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र राहणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आशिष मोरे, राहुल गायकवाड, संगीता देशमुख, श्रीमती दांडगे ताई यांनी मेहनत घेतली, सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जय भवानीत भागवत जाधव यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव



**पाटोदा (प्रतिनिधी) :** येथील जय भवानी महाविद्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री भागवत बाबासाहेब जाधव हे नियत वयोमानानुसार दि. ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले . त्यांच्या सेवापूर्ती निमित्त महाविद्यालयात त्यांचा सेवागौरव करण्यात आला. या सेवागौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन माजी प्रचार्य प्रा. मोहन परजने व जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते. तर व्यासपीठावर मा. श्री. बप्पासाहेब जाधव , स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य मा.श्री.दिलीपराव जाधव , माजी प्राचार्य प्रा.डॉ. सय्यद शौकत आदि मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी प्रस्ताविक प्रा..डॉ.वंदन जाधव यांनी केले.या प्रसंगी वेदविद्या शिक्षणात अतिउत्तम ठरणारा विद्यार्थी धसे हर्ष या विद्यार्याचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.सत्कारमुर्ती श्री. भागवत जाधव यांचा सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते सपत्नीक शाल ,पुष्प गुच्छ,सन्मान चिन्ह व संपूर्ण कपड्याचा आहेर देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी प्राचार्य डॉ . सय्यद शौकत , प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य प्रा.मोहन परजणे यांनी श्री. भागवत जाधव यांच्या कार्यालयीन कामकाजाचे अनुभव सांगुन त्यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा! दिल्या. मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी श्री.भागवत जाधव यांनी महाविद्यालयात केलेल्या कामाचे कौतुक करून त्यांची महाविद्यालयास उणिव भासेल असे सांगुन त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सत्काराला उत्तर देताना श्री. भागवत जाधव यांनी सांगितले की मी याच महाविद्यालयात शिक्षण घेतले व या महाविद्यालयात सेवा करण्याची मला शिक्षण महर्षी माजी मंत्री मा.शिवाजीरावदादा पंडित व माजी आ.अमरसिंह भैय्यासाहेब पंडित व मा.जयभाऊ पंडित यांच्यामुळे मला संधी संधी मिळाली हे मी कधीही विसरणार नाही.काम करताना सर्वांनी मला सहकार्य केले. हे मी कधीही विसरणार नाही. काम करताना माझ्याकडून कोणाचे मन दु:खावले असेल तर मला मोठ्या मनाने माफ करावे असे सांगताना त्यांना आपले आश्रु आवरता आले नाहीत.ते भावनिक झाले होते. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी श्री. भागवत जाधव यांच्या प्रमाणिक कामाचे कौतुक करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा! दिल्या. व जेव्हा जेव्हा महाविद्यालयाला गरज पडेल तेव्हा हक्काने महाविद्यालयाच्या कामास मदत करावी असे अहवान केले. कार्यक्रमाचे संचलन श्रीमती प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी केले तर आभार कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी मानले या प्रसंगी माजी कार्यलयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस , श्री. अरुण काका मठपती, इंजी. राज जाधव श्रीमती रेखाताई जाधव व त्यांचे स्नेही, सर्व प्राध्यापक वृंद, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**


| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १२ एप्रिल २०२६


## बाळासाहेब पवार वाचनालयात हेरंब कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन



**कन्नड (अरुण थोरात) :** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त दि.13 एप्रिल रोजी कन्नड येथे ज्येष्ठ विचारवंत हेरंब कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.समाजप्रबोधनाचे महानायक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 200 व्या जयंतीनिमित्त महात्मा फुले जयंती उत्सव समिती कन्नड ,सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, कन्नड व बाळासाहेब पवार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. 13 एप्रिल रोजी सकाळी 10:30 वाजता जेष्ठ विचारवंत हेरंब कुलकर्णी यांचे महात्मा ज्योतिबा फुले यांचा दृष्टिकोन घेऊन आज काय करायला हवे?" या विषयावर या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात हे व्याख्यान संपन्न होणार आहे.

सदर कार्यक्रम सर्व नागरिक व विद्यार्थ्यांसाठी खुला असून, कन्नड परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या विचारप्रबोधनात्मक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महात्मा फुले जयंती उत्सव समिती आणि सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये सामाजिक समता दिन वाचन करून साजरा




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** यंदाचे वर्ष हे महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाकडून दि. ८ ते १४ एप्रिल या सप्ताह कालावधीत संपूर्ण राज्यभरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमानिमित्ताने वाचन उपक्रम शनिवारी (ता.११) रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे होते. यावेळी माधवराव पाटील महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. राजकुमार देवशेट्टे, उपप्राचार्य योगेश पाटील, प्रा. रफिक शेख, प्रा. सुमित ढंगे, प्रा. प्रियंका काजळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पद्मश्री डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. श्री माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने ग्रंथालयात वाचन उपक्रमांतर्गत दिवसभर वाचन करून हा दिवस साजरा करण्यात आला. प्रा. हर्षद बदोले, किशोर कारभारी, नितीन कंटेकुरे, मल्लिकार्जुन स्वामी, बालाजी शेळके, चंद्रकांत पुजारी आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विनंती बसवंतबागडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रफिक शेख तर आभार प्रा. वैष्णवी पाटील यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## सविता सिताराम वेलदोडे यांना पीएच.डी. प्रदान



**छत्रपती संभाजीरनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे विद्याशाखेच्या अंतर्गत इतिहास विषयात सविता सिताराम वेलदोडे यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. वेलदोडे यांनी प्रा. व इतिहास विभाग प्रमुख डॉ. गीतांजली भीमराव बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली "पितृसत्ता व लिंगभावी जडणघडणीच्या संदर्भात १९ व्या शतकातील महाराष्ट्रीयन गृहिणींच्या आत्मभानाचा संघर्ष: एक अभ्यास" या विषयात संशोधन करून शोध प्रबंध सादर केला सविताने पीएच.डी. मिळवल्याने मार्गदर्शिका प्रा. डॉ. गीतांजली बोराडे, इतिहास विभाग, मिलिंद सुरडकर, सुरडकर परिवार, वेलदोडे परिवार, आणि मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन..



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ.भूषण नाफडे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी डॉ. भगवानसिंग डोभाळ, डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा.संभाजी कांबळे प्रा. ओमप्रकाश चव्हाण, प्रा.रविंद्र भोरे, प्रा. बळीराम कटारे, प्रा. विलास भुतेकर प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. निशिकांत लोखंडे प्रा.अभिजीत भुतेकर प्रा. प्रमोद अवचार, प्रा. बी.बी.सले प्रा.स्वाती पुरी प्रा. क्षमा अनभुले, प्रा. सुनीता भराडे, प्रा. सायरा काझी, प्रा. व्यंकटेश कोरेबोईनवाड, विजय लोणकर, यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. स्मिता निर्मल यांनी केले.

## महात्मा जोतीबा फुले, खरे मानवतावादी होते : प्राचार्य केशव भांगे



**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये 'क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले' यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, महात्मा ज्योतीबा फुले यांनी पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा सुरू करून शिक्षणामध्ये क्रांती घडवून आणली.सर्वप्रथम त्यांनी सावित्रीला शिकवून,पहिली महिला शिक्षिका घडवली.आणि महिलांसाठी शिक्षणाचे दार खुले करून समस्त महिलांच्या जीवनाचा उद्धार केला.त्यांच्या काळात वर्णव्यवस्थेच्या आणि धर्मव्यवस्थेच्या वरवंट्याखाली सामान्य व शूद्रातिशूद्र माणूस भरडून निघत होता.त्यांना सार्वजनिक ठिकाणी जाता येत नव्हते.पाणी पिण्यासाठी सुद्धा मज्जाव केला जात होता.अशावेळी ज्योतिरावांनी अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पाण्याची विहीरचं खुली करून दिली.शेतकऱ्यांच्या मुला-मुलांनी शिक्षण घेऊन आपली उन्नती आणि प्रगती करावी.अशी ज्योतिबांना शेतकऱ्यांबद्दल तळमळ वाटत होती.यामुळे महात्मा ज्योतिराव फुले खरेच मानवतावादी आहेत, हे सिद्ध होते.तेव्हा आपण सर्वांनी ज्योतिबा फुलेंचा आदर्श घेऊन अखिल मानवाच्या कल्याणासाठीचा मार्ग निवडला पाहिजे,असे त्यांनी भाषणातून आवर्जून सांगितले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे,प्रा.महारुद्र डोंगरे,प्रा.नामदेव तरकसे,प्रा. संजय आव्हाड, प्रा.अशोक इनकर,प्रा.नारायण घोलप,प्रा.अनिल जरे,प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.बिभीषण घायाळ, प्रा.महादेव हांगे,प्रा.नारायण तांबे,प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.घनश्याम चव्हाण,प्रा.दत्ता शिंदे,डॉ. अशोक घोडके,डॉ.सत्यनारायण ढवळे,प्रा.सुनील मोरे,प्रा. दत्ता गायकवाड,प्रा.अशोक सवासे, प्रा. लक्ष्मण गव्हाणे,प्रा.हनुमंत घायाळ, प्रा. शशिकांत जावळे, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अक्षय रणखांब,प्रा.अमर खोले,प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सविता दराडे,प्रा. सीमा ढवळे,सौ.अनिता लाटे,रवींद्र बडे,वसंत आहेर, आप्पासाहेब कांबळे,प्रकाश राऊत,बाळासाहेब येवले,जयेंद्र निकम,नितीन बहिर,रोहित शिराळे,रवींद्र गव्हाणे,आदिनाथ काशिद,सुनील खेडकर,नंदकुमार जाधव,विलास कांबळे,गौतम भौसले,या सर्वांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.

यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.